दुरध्वनी क्रमांक: 0240-254200
फॅक्सक्रमांक : 0240-2654247
ई-मेल :srpfgr14@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
भारत राखीव बटालियन -1
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.14,
सातारा परिसर छत्रपती संभाजीनगर-431010.

जा.क्र.आस्था/भाराब -1/पो.भ-2022-23/प्रेस नोट/2024/ 3119 छत्रपती संभाजीनगर दिनांक :-10/07/2024.

# प्रेस नोट

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.14 (भाराब-1), छत्रपती संभाजीनगर या आस्थापनेवर सन 2022-23 मध्ये रिक्त असलेल्या 173 पदांकरीता सशस्त्र पोलीस शिपाई भरती प्रक्रिया मैदानी चाचणी दि.19/06/2024 ते दि.03/07/2024 या कालावधीत घेण्यात आली होती.

सदर मैदानी चाचणीमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे महाराष्ट्र सशस्त्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश), नियम-2012 व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा शारीरिक चाचणीत किमान 50 टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार यांची संबंधीत प्रर्वगामधील जाहिरातीत नमुद केलेल्या रिक्त पदांच्या अनुषंगाने 1:10 या प्रमाणे लेखी परीक्षेसाठी 2013 उमेदवार लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेले आहेत. सशस्त्र पोलीस शिपाई लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची समाजिक व समांतर आरक्षणासह गुणांची यादी www.mahapolice.gov.in, **policerecruitment2024.mahait.org, www.maharashtrasrpf.gov.in** या वेबसाईटवर व या घटकाचे मुख्य प्रवेशद्वार येथे नोटीस बोर्डावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच उमेदवारांना महाआयटी विभागाकडुन सशस्त्र पोलीस शिपाई पदाच्या लेखी परीक्षेचे स्वतंत्र प्रवेश पत्र निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदरची लेखी परीक्षा हि वस्तुनिष्ठ स्वरुपाची असणार आहे.

संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या उमेदवारांची सशस्त्र पोलीस शिपाई पदाची लेखी परीक्षा दिनांक 14/07/2024 रोजी **" महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी " (MIT, Collage), गेट नंबर.01 व गेट नंबर.05, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर शहर येथे** 11.00 ते 12.30 वाजेपावेतो घेण्यात येणार आहे. परंतु उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर सकाळी 07.00 वाजता हजर राहणे आवश्यक आहे.

**" महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी " (MIT, Collage),**
**गेट नंबर.01 व गेट नंबर.05, बीड बायपास रोड,**
**छत्रपती संभाजीनगर शहर.**

**तसेच लेखी परीक्षेकरीता या कार्यालयाकडुन परीक्षा पॅड व ब्लॅक बॉल पेन पुरविण्यात येणार आहेत. उमेदवारांनी लेखी परीक्षेकरीता येतांना सोबत फक्त प्रवेशपत्र (हॉल तिकीट), आवदेन अर्ज, पासपोर्ट साईज फोटो व मुळ आधारकार्ड आणावे**. इतर कोणतेही किंमती वस्तु, कॅल्क्युलेटर, स्मार्टवॉच, मोबाईल फोन, हेडफोन, ब्ल्युटुथ-हेडफोन व इतर इलेक्ट्रॉनिक वस्तु सोबत बाळगु नये.

ठिकाण :- समादेशक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
दिनांक :- 10/07/2024.

**( रमेश ब. वेठेकर )**
सहायक समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.14 (भाराब-1),
छत्रपती संभाजीनगर.